**महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या**

**दिनांक : १२/०६/२०१५ रोजी सकाळी १०.०० वाजता**

**आयोजित केलेल्या २६१ व्या बैठकीचे कार्यवृत्त**

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाची २६१ वी बैठक शुक्रवार, दिनांक १२/०६/२०१५ रोजी सकाळी १०.०० वाजता मा.प्रधान सचिव / गृहनिर्माण विभाग यांचे दालन, ३ रा मजला, मुख्य इमारत, मंत्रालय, मुंबई : ४०० ०३२ येथे आयोजित करण्यात आली.

**सदरहू बैठकीस खालील प्रमाणे उपस्थिती होती :**

१. **श्री.एस.एस.झेंडे** : **पदसिध्द अध्यक्ष/प्राधिकरण**
**उपाध्यक्ष / प्राधिकरण**

२. **श्री.श्रीकांत सिंह,** : **सदस्य/प्राधिकरण**
**प्रधान सचिव, गृहनिर्माण विभाग**

३. **श्री. नितीन करीर** : **सदस्य/प्राधिकरण**
**प्रधान सचिव, नगरविकास विभाग**

सचिव / प्रा. यांनी सन्माननीय सदस्य आणि सर्व उपस्थितांचे स्वागत केले. तद्नंतर मा.उपाध्यक्ष तथा पदसिध्द अध्यक्ष / प्रा. यांच्या परवानगीने विषय सुचीवरील विषय चर्चेस घेण्यात आले.

**बाब क्रमांक : २६१/१**

**विषय :- महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या दिनांक २५/०३/२०१५ रोजी झालेल्या २६० व्या बैठकीचे प्रारुप कार्यवृत्त स्थायी करण्याबाबत.**

---------------------

उक्त विषय सचिव/प्राधिकरण यांनी सभागृहापुढे सादर केला.

२६० व्या बैठकीचे कार्यवृत्तांत स्थायी करताना मा.प्रधान सचिव/नगर विकास विभाग, सदस्य/प्रा. यांनी सांगितले कीं, कार्यवृत्तांतातील बाब क्रमांक २६०/४ चा ठराव क्र.६६८८ मंजूरीसाठी आला त्यावेळी ते उपस्थित नसल्याने सदर ठराव पुन्हा प्राधिकरणासमोर आणणेचे ठरले.

तसेच मा.प्रधान सचिव/नगर विकास विभाग, सदस्य/प्रा. यांनी सांगितले कीं, बाब क्र.२६०/७ वर चर्चा करताना, मा.प्रधान सचिव/ नगर विकास विभाग, सदस्य / प्रा. यांनी खाजगी बँकांमध्ये गुंतवणूक करण्याबाबत शासन निर्णय आहे किंवा कसे, याची खात्री करुन घेण्यास सांगितले होते त्याप्रमाणे खात्री करुन घेण्यात आली आहे का, अशी विचारणा केली.

यावर वित्त नियंत्रक / प्रा. यांनी संगितले कीं, याबाबत २००६ सालातील शासन निर्णय आहे. त्याची खात्री केली आहे.

यावर मा.प्रधान सचिव, नगर विकास विभाग, सदस्य / प्रा. यांनी सांगितले कीं, २००६ च्या शासन निर्णयामध्ये बदल झाला असून नविन शासन निर्णय आला आहे. याबाबत केंद्र शासनाकडून एक परिपत्रक आले होते त्याच्या आधारे राज्य शासनाच्या वित्त विभागाने नव्याने शासन निर्णय निर्गमित केला आहे, त्याची खात्री करुन घेण्यात यावी.

तसेच मा.प्रधान सचिव, नगर विकास विभाग, सदस्य / प्रा. यांनी सांगितले कीं, २६० व्या कार्यवृत्तांतातील पृष्ठ क्रमांक १२ वर नमूद बाब क्रमांक २६०/९ मधील नियमावर चर्चा होताना, खरेदी करावयाच्या क्षेत्रापैकी प्रस्तावित सोलापूर-विजापूर या राज्य महामार्ग क्र.एनएच-१३ अंतर्गत संपादन होणारे १००० चौ.मी. क्षेत्र वगळण्यास प्राधिकरणाने मान्यता दिली होती. त्यामुळे ठराव क्र.६६९२ ची शब्दरचना त्याप्रमाणे दुरुस्त करण्यात यावी. त्यानुसार पुढील प्रमाणे सुधारित ठराव करण्यात आला.

## आधीचा ठराव

**ठराव क्रमांक : ६६९२** **दिनांक : २५/०३/२०१५**

प्राधिकरणाने एकमताने निर्णय घेतला की, प्राधिकरणाचा ठराव क्र.६६६२, दिनांक २२/०५/२०१४ अन्वये मंजूरी देण्यात आलेल्या मौजे बाळे ता.उत्तर सोलापूर, जिल्हा सोलापूर येथील **१)**जमीन मालक श्री. मकरंद चिंदरकर व इतर यांच्या स.क्र.७५/१अ/१, ७५/१अ/२अ तसेच ७५/१अ/२ब मधील एकुण क्षेत्र ४८४०० चौ.मी. पैकी प्रस्तावित सोलापूर - विजापूर या राज्य महामार्ग क्र.एनएच-१३ अंतर्गत संपादन होणारे क्षेत्र १००० चौ.मी. वगळून उर्वरित ४७४०० चौ.मी. व **२)**जमीन मालक श्री. मंत्री / श्री. मिनजगी यांच्या स.क्र.७५/२ब मधील एकुण क्षेत्र १०४०० चौ.मी. असे दोन्ही मिळून ५७८०० चौ.मी. इतके क्षेत्र म्हाड अधिनियम १९७६ कलम ५२ अंतर्गत प्राधिकरणाचा ठराव क्र.६६६२, दि.२२/५/२०१४ अन्वये मान्य करण्यात आलेल्या म्हणजेच अ.क्र.१ करिता ८८२६/- प्रती चौ.मी. व अ.क्र.२ करिता रु.६४५८/- प्रती. चौ.मी. या दराने जमीन खरेदी करण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

सदर ठरावाची अंमलबजावणी स्थायीकरणाची वाट न पहाता करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

## त्याऐवजी सुधारित ठराव

**ठराव क्रमांक : ६६९२** **दिनांक : २५/०३/२०१५**

प्राधिकरणाने एकमताने निर्णय घेतला की, प्राधिकरणाचा ठराव क्र.६६६२, दिनांक २२/०५/२०१४ अन्वये मंजूरी देण्यात आलेल्या मौजे बाळे ता.उत्तर सोलापूर, जिल्हा सोलापूर येथील **१)**जमीन मालक श्री. मकरंद चिंदरकर व इतर यांच्या स.क्र.७५/१अ/१, ७५/१अ/२अ तसेच ७५/१अ/२ब मधील एकुण क्षेत्र ४८४०० चौ.मी. पैकी प्रस्तावित सोलापूर - विजापूर या राज्य महामार्ग क्र.एनएच-१३ अंतर्गत संपादन होणारे क्षेत्र १००० चौ.मी. वगळण्यास प्राधिकरण मान्यता देत आहे.

सन्माननीय सदस्यानी बैठकीच्या प्रारुप कार्यवृत्तांतात सुचविलेल्या दुरुस्तीसह आणि दिलेल्या सुचनांसह सदर कार्यवृत्त एकमताने स्थायी करण्यात आले.

**बाब क्रमांक : २६१/२**

**विषय :- महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या दिनांक २५/०३/२०१५ रोजी झालेल्या अर्थसंकल्पिय विशेष बैठकीचे प्रारुप कार्यवृत्त स्थायी करण्याबाबत.**

---------------------

उक्त विषय सचिव/प्राधिकरण यांनी सभागृहापुढे सादर केला.

सन्माननीय सदस्यानी बैठकीच्या प्रारुप कार्यवृत्तांतात दुरुस्ती न सुचविल्याने सदर कार्यवृत्त एकमताने स्थायी करण्यात आले.

**बाब क्रमांक : २६१/६**

**विषय :- मंजूर विकास योजना-नवीन चंद्रपूर (म्हाडा) मौजा-कोसारा तह.चंद्रपूर येथील स.क्र.१२० आराजी १.२७ हे.आर.जागेच्या अकृषीक परवानगी प्रकरणी अभिन्यास मंजूरीबाबत.**

---------------------

**ठराव क्र. : ६६९६** **दिनांक : १२/०६/२०१५**

प्राधिकरणाने एक मताने निर्णय घेतला कीं, मंजूर विकास योजना-नवीन चंद्रपूर (म्हाडा) मौजा-कोसारा ता.चंद्रपूर येथील स.क्र.१२० आराजी १.२७ हे.आर.जागेवरील डीपी रस्त्याच्या Alignment बाबत व अशा इतर प्रकरणांबाबत १५ टक्क्यापर्यंत तफावत येत असल्यास Road Alignment १५ टक्के deviation देण्याचे अधिकार जे मंजूर विकास नियंत्रण नियमावली नियम क्र.३१ उपनियम मधील खालील स्वेच्छाधिकार (iii) interpret provision of these rules where the Streets Layout actually on the ground varies from the street Layout as shown on the Development Plan मुख्य अधिकारी / नागपूर गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ यांना त्यांनी मुख्य वास्तुशास्त्रज्ञ व नियोजनकार / प्रा. यांच्या सल्ल्याने ने करणेकरिता देण्यात येत आहेत. परन्तु १५ टक्क्यापेक्षा जास्त तफावत असल्यास प्राधिकरणासमोर प्रस्ताव सादर करण्यात यावा, यास प्राधिकरण मंजूरी देत आहे.

**बाब क्रमांक : २६१/८**

**विषय :- महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणातील विविध संवर्गाचे सेवाप्रवेश नियम-दुरुस्ती व सुधारणा.**

---

**ठराव क्र. : ६६९७** **दिनांक : १२/०६/२०१५**

प्राधिकरणाने एक मताने निर्णय घेतला कीं, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणातील विविध संवर्गाचे सेवाप्रवेश नियमाबाबत यापूर्वी करण्यात आलेले ठराव अधिक्रमित करुन, शासनाकडून प्राप्त झालेल्या दिनांक २९/०४/२०१४ रोजीच्या पत्रातील निर्देशानुसार प्रचलित सेवाप्रवेश नियमावलीत सोबतच्या परिशिष्ट "अ", "ब" व "क" मध्ये दर्शविल्याप्रमाणे आवश्यक त्या दुरुस्त्या / सुधारणा करण्यात आलेल्या आहेत व त्यास प्राधिकरण मान्यता देत आहे. तसेच सदर ठराव शासनाकडे पाठविण्यास मंजूरी देत आहे.

सदर ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट न पहाता करण्यास मान्यता देण्यात येत आहे.